18 June 2009

## - ज्ञानविज्ञान योग -

### अध्याय - ७ वा

सहाव्या अध्यायाचा समारोप करताना भगवंत म्हणतात - श्रद्धावंत योगी मला परमश्रेष्ठ वाटतो. असा योगी परमात्म्याचे (श्रेष्ठ) यथार्थ रूप जाणून मुक्ती मिळवतो परमात्म्याचे हे यथार्थ रूप कसे आहे अशी भावना अर्जुनाच्या मनात जागणे अगदी स्वाभाविक आहे. भगवंतांनी हे जाणले आणि ७ व्या अध्यायात परमात्मस्वरूप उलगडून दाखवले.

परमात्म्याची दोन रूपे आहेत.

निर्गुण व सगुण; यांनाच निरुपाधिक व सोपाधिक; अव्यक्त व व्यक्त अशी नावे आहेत. भगवंताचे जे व्यक्त रूप ते दृश्य विश्व होय त्यालाच अपरा प्रकृती म्हणतात ती जड आहे. त्यामागील जे आत्मस्वरूप चैतन्य त्याला परा प्रकृती म्हणतात. यालाच - अपराप्रकृतीला विज्ञान तर परा प्रकृती म्हणजे ज्ञान होय. भगवंतच सर्व जगताचे मूलकारण आहेत. सर्व व्यक्त - अव्यक्त रूपे त्यांचीच आहेत. ७ व्या अध्यायातील ८ ते १२ श्लोकात अशी १४ रूपे सांगितली आहेत. हे भगवंताचे अंश किंवा विभूती आहेत. ही सर्व रूपे शिवाय मायामय प्रकृतीचे त्रिगुण परमात्मरूपातूनच प्रकट होतात केवळ भगवत्कृपेमुळे ही माया तरून जाता येते मूढ जन मायेतच रमतात. पण आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी भगवत्कृपेचा लाभार्थी म्हणून प्रयत्न करतात यापैकी ज्ञानी भक्त सर्वश्रेष्ठ असतो. असा



©www.madhaveeraghuveer.com

# 14

September
Monday
Week 38
257-108

2009

| August | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| Monday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Tuesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Wednesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Thursday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Friday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Saturday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Sunday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

9.00 ज्ञानी 'वासुदेवः सर्वम्' अशी अनुभूती घेतो. ज्ञान आणि विज्ञान (अव्यक्त आणि व्यक्त) ही दोन्ही
10.00 भगवंताचीच रूपे आहेत हे आत्मज्ञानी जाणतो त्याचेच विवेचन या अध्यायात आहे म्हणून या
11.00 अध्यायाचे 'ज्ञानविज्ञानयोग' हे नाव सार्थ आहे.
'तत्त्वमसि' या वाक्यात उपनिषदाने
12.00 जीव-जगत-जगदीश यांचे रहस्य उलगडले आहे. गीता उपनिषदांचे सार आहे. पहिल्या ६
1.00 अध्यायात त्वम् पद म्हणजे जीवतत्त्वावर प्रकाश टाकला आहे आता सातव्या अध्यायापासून तद् पद
2.00 म्हणजे ईश्वर-ईशतत्त्वावर प्रकाश टाकीत आहेत. पुढे १३ ते १८ या अध्यायात 'असि' पद-
3.00 यामध्ये त्वम् आणि तद् यांचे अद्वैत प्रस्थापित केले आहे.

4.00

5.00

6.00

7.00

8.00

© www.madhaveeragnuveer.com

(३) समग्रम् - परमात्म्याचे निर्गुण व सगुण रूप या अध्यायात उलगडून दाखवले आहे.

निष्काम कर्मयोगाच्या दोन अवस्था. त्यापैकी निम्न अवस्थेत कर्मफळे जरी ईश्वरार्पण केले तरी महत्त्व कर्मालाच रहाते. त्यामुळे असा कर्मयोगी मदाश्रय: किंवा मद्गतान्तरात्मा होऊ शकत नाही. तर उच्च अवस्थेत कर्ता सिद्धयोगारूढ झाल्याने कर्त्याची स्वतंत्र (अवस्था) रहाता उरत नाही. त्यामुळे तो मय्यासक्तमना: किंवा मदाश्रय: होऊ शकतो.

प्रापंचिक वस्तुबद्दल आसक्ती नसावी परंतु परमार्थामध्ये अकरा प्रकारच्या आसक्ती आहेत. ईश्वराच्या ठिकाणी आपले मन अनन्य प्रेमाने आसक्त करावे. ही आसक्ती काममय नाही तर ती निरिच्छ आहे.

नारद भक्तिसूत्रात म्हटले आहे. भक्त हा प्रसंगानुसार देवाचा सखा, पुजारी, दास, पत्नी वा पती, माता-पिता, बालक होऊन ईश्वराची पूजा करतो. या भक्तिसोपानाची अंतिम पायरी म्हणजे 'परमविरहासक्ती' आहे.

परमेश्वराबद्दलच्या आसक्तीचे वैशिष्ट्य हे की भक्त प्रपंचात गुंतून न पडता उलट एका एका पाशातून मुक्त होत जातो आणि मोक्षाची पायरी गाठतो. हा पराभक्तीचा 'एकादश सोपान' आहे.

१) गुणमाहात्म्यासक्ती - परमेश्वर म्हणजे ज्ञानियांचे गुज आहे. मुक्तीचे बीज आहे, संतांची विश्रांती आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| August | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| Monday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Tuesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Wednesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Thursday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Friday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Saturday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Sunday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

काय वानू आता पायाचा महिमा।
जेथे झाली क्षमा बोलायाची॥

२) रूपासक्ती - परमेश्वर हा लावण्याचा सागर आहे त्याच्यापुढे लक्ष लक्ष सूर्य सुद्धा म्लान होतात.

राजस सुकुमार मदनाचा पुतळा

३) पूजासक्ती - त्याची पूजा करावी असा ध्यास लागतो. पार्थिव पूजा शक्य नसेल तेव्हा मानसपूजा ही भगवंतापर्यंत पोहोचते तो त्याचा आनंदाने स्वीकार करतो.

मन हा मोगरा, मन हे शेवंती मन हे तुळशी

अशा आर्ततेने, तन्मयतेने भक्त आपले मन त्या परमेश्वराला समर्पित करतात

किंवा शिवमानसपूजेत आचार्य म्हणतात

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः
प्राणाः शरीरं गृहम्।
पूजा ते विषयोपभोगरचना
निद्रा समाधिस्थितिः॥
संचारः पदयोः प्रदक्षिणाविधिः
स्तोत्राणि सर्वा गिरो।
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं
शम्भो तवाराधनम्॥

४) स्मरणासक्ती - ईश्वराचे नाम म्हणजे जणू पंचमवेदच आहे. नामसाधनेचे महत्त्व अनेक संतांनी वर्णन केले आहे.

घेई घेई माझे वाचे गोड नाम विठोबाचे।

नामात नामी वास करतो.

पुन्हा पुन्हा जेवढे अधिकाधिक भगवंताचे नाम घ्यावे तेवढी नामसाधनेवरची श्रद्धा दृढ होत जाते. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी तर भक्तांसाठी सोपी साधना सांगितली आहे ती म्हणजे 'नामस्मरण'

(५) दास्यासक्ती - अनन्यतेचे रूप. एक माझा स्वामी अन्य काही नको इतकी शरणागत अवस्था. हनुमंत, गरुड ही याची उदाहरणे. दासाला ईश्वराच्या चरणांशिवाय दुसरे अधिष्ठान नसते.

(६) सख्यासक्ती - परमेश्वराशी मैत्रीचे नाते जोडणे. हे भाग्य अर्जुनाला लाभले. ज्याला परमेश्वराशी सख्य करता येते त्याला प्रेमकलह ही करता येतो त्याला जाबही विचारता येतो. (उद्धव, सुदामा

अपरं भक्तो अहं परं जना निवरतः।

संत नामदेवही विठ्ठरायाला म्हणतात -

आम्ही भक्त तरी तू भक्तवत्सल।

आम्ही आहोत म्हणून तू आहेस एरवी तुला पुसतो कोण?

(७) कांतासक्ती - मीरेची भक्ती, गोकुळातील गोपिका. कोणा भक्ताने कबीराच्या भक्तीची स्तुती केली तेव्हा तो म्हणाला -

कबीर कबीर क्या कहे जाव जमुनाके तीर
एक एक गोपी के प्रेममें बह गये कोटि कबीर॥

काही तथाकथित विद्वान मंडळींना या कृष्ण-गोपीच्या नात्यात व्यभिचार दिसतो परंतु ही कांतासक्ती म्हणजे उच्च दर्जाची भक्ती आहे.

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः।
आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चिता मतिः॥

©www.madhaveeraghuveer.com

परमेश्वराला आपला पती मानणे ही भावना स्त्री पुरुष दोघांमध्येही दिसून येते. तिथे लिंगभेद उरतच नाही. पंढरीच्या विठ्ठलाला नाही का भक्त विठूमाऊली म्हणत.

त्याप्रकारे संत नामदेव परमेश्वराकडे पती या भावनेने पहातात. एका अभंगात ते म्हणतात.

तू आकाश मी शशिका। तू लिंग मी साळुंका
तू समुद्र मी चंद्रिका। स्वयें दोन्ही।।
तू वृंदावन मी चिरी। तू तुळस मी मंजिरी।
तू पावा मी मोहरी। स्वयें दोन्ही।।
तू चांद मी चांदणी। तू नाग मी पद्मिणी।
तू कृष्ण मी रुक्मिणी। स्वयें दोन्ही।।
तू नदी मी थडी। तू तरु मी सांगडी।
तू धनुष्य मी भातोडी। स्वयें दोन्ही।।
तू वेद मी संहिता। तू शास्त्र मी गीता।
तू गंध मी अक्षता। स्वयें दोन्ही।।
नामा म्हणे पुरुषोत्तमा। स्वयें जडलो तुझ्या प्रेमा।
मी कुडी तू आत्मा। स्वयें दोन्ही।।

(८) वात्सल्यासक्ती - उत्तम उदाहरण म्हणजे यशोदा. त्या अलभ्य सुखाचा अनुभव घेण्यासाठी संत वात्सल्य भावनेने भगवंताकडे पहातात किंवा स्वतः बालक होऊन विठ्ठमाऊलीच्या भेटीची आस धरतात. रात्रंदिवस विठ्ठलाईच्या भेटीची आस धरतात, वात्सल्यप्रेमाचा धावा करतात. एकमा भक्तीची ही अलौकिक खूण आहे.

© www.madhaveeguruveer.com

हरिचिया दासा हरी दाही दिशा
भावे जैसा तैसा हरि एक।



9.00 (९) आत्मनिवेदनासक्ती - ईश्वराच्या दर्शनाची लागलेली
ओढ इथे पूर्ण होते. ईश्वराच्या प्रसादाचा लाभ झालेला
10.00 भक्त प्रचितीने, प्रत्ययाने बोलू लागतो.
जिकडे पहावे तिकडे विठ्ठल अवघा।
11.00 अशी आत्मनिवेदनासक्ती सोसाहूनही आनंददायी आहे.
(१०) तन्मयासक्ती - पांडुरंगाचे रूप डोळ्याने पहाता
12.00 पहाता डोळ्यातील बाहुलीच पांडुरंग होणे ही खरी
तन्मयता होय. अशी तन्मयता प्राप्त झाली की भक्ताचे
1.00 अष्टसात्विक भाव जागृत होतात. तन्मयासक्तीत
भक्ताचा भाव एकविध होतो.
2.00 कामधाम संसार विसरली हरिभजनी रंगली राधिका।
किंवा गवळणी दही दूध विकण्यासाठी मथुरेच्या
3.00 बाजारात जातात तेव्हा वेडावल्यासारख्या वागतात.
विक्रेतुकामा किल गोपकन्या मुरारिपादार्पितचित्तवृत्तिः
4.00 दध्यादिकं मोहवशादवोचद् गोविन्द दामोदर माधवेति।
तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल।
5.00 माता विठ्ठल पिता विठ्ठल बंधु विठ्ठल गोत्र विठ्ठल।
गुरु विठ्ठल गुरुदेवता विठ्ठल निधान विठ्ठल निरंतर विठ्ठल
6.00 नामा म्हणे मज विठ्ठल सापडला म्हणोनि कळिकाळा पाड नाही।
नामदेवांसाठी विठ्ठल हे सुखाचेही सुख आहे.
7.00 अनिर्वचनीय सुख अंतःकरणात तुडुंब दाटलेले आहे.
(११) परमविरहासक्ती - एखादा क्षणाही जर परमेश्वराचा
8.00 विरह झाला तर व्याकुळता निर्माण होते. पाण्याविना
मासोळी जशी तडफडते ती व्याकुळता या भक्तीत
असते. चक्रवाक पक्षी वियोगे पहाती।
झाले मनवृत्ती तैसी आता।

पीतांबराची साडी ल्याली। मोरपिसाची करी काचोळी
वेळी अवेळी काजळ घातली। मिठी मारणे प्रतिबिंबाला।
वेड लागले राधेला।

आत्मा वारे ओळखावा, द्रष्टव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्यः ।

# 21

September
Monday
Week 39
264-101

2009

| August | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| Monday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Tuesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Wednesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Thursday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Friday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Saturday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Sunday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

9.00 काय माझा आता पाहतोसी अंत ।

असा टाहो भक्त फोडतो. परमेश्वरावाचून वाट्याला
10.00 आलेला एकेक क्षण युगाएवढा प्रदीर्घ वाटतो. ह्या
परमव्याकुळतेचा एखादा क्षणही ज्याने अनुभवला
11.00 त्याचे आयुष्य धन्य झाले.

त्रिवेणी संगम – १ पारमार्थिक आसक्ती
12.00 २. भक्ताने आश्रय घ्यायचा तो केवळ भगवंताचाच
1.00 ३. योगसाधना करणे.

या तिन्ही गोष्टींचा समन्वय झाला की
2.00 षडैश्वर्यसंपन्न अशा भगवंताचा साक्षात्कार होतो.

(२) आत्मा जाणला की सर्वच जाणले.
3.00 याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद
परब्रह्माचे आत्मज्ञान अंतिम आहे. ते जाणल्यामुळे
4.00 तुला जाणावयाचे काही शिल्लक रहाणार नाही.
ज्ञान म्हणजे आत्मज्ञान आणि
5.00 विज्ञान म्हणजे विश्वज्ञान
ज्ञान वा आत्मज्ञान विशेष असल्याने ते दुर्लभही
6.00 आहे. ते उत्तम फळ देणारे आहे.

(३) सिद्धी – मोक्ष
7.00 अनंत योग्यांमध्ये एखाद्यालाच मोक्ष लाभतो.
रामकृष्ण परमहंस म्हणाले होते "मी अशी विद्या
8.00 शिकू इच्छितो की जिच्यामुळे ज्ञानाला उदय
होऊन माणूस खरोखर कृतार्थ होतो". सामान्य जन
लौकिक विद्येच्याच मागे लागतात. असामान्य महात्मे

सहस्रांमध्ये कोणी एक । पाहे देवाचे ~~[illegible]~~ विवेक
परी या देवाचे कौतुक । ठाई न पडे ॥ ८.९.९३

© www.madhaveeraghuveer.com

नाशिवंत देह संपत्ती जाणोनी।
वासना वाहातुडी झडोनि आलो ॥

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

2009

September
Tuesday
Week 39
265-100
22

9.00 मात्र आत्मविद्येचाच ध्यास धरतात.

(२) अपरा प्रकृती - यात सर्व लौकिक शास्त्रे

10.00 सामावतात.

१. पृथ्वी - पदार्थविज्ञान, भूगोल, प्राणिशास्त्र

11.00 २. आप - जलविज्ञान, रसायन

३. अनल - विद्युत

12.00 ४. वायु - सर्व वायु

५ आकाश - ज्योतिषशास्त्र, खगोलविज्ञान

1.00 या सगळ्यात भगवंताचे दर्शन घेणे हे विज्ञान आणि भगवंतामध्ये शरणागती घेऊन त्यात

2.00 लीन होणे हे ज्ञान!

६ मन - सर्व साहित्य, वाङ्मय मनातून निर्माण होते

3.00 नाट्यशास्त्रात मन परकायाप्रवेश शिकवते.

७. बुद्धी - मनाच्या पुढे बुद्धी आहे त्यातून गणित

4.00 निर्माण झाले. तर्कशास्त्र, स्मरणशक्ती ही बुद्धीची झेप आहे. एका बुद्धीत सर्व भौतिकशास्त्रे आली

5.00 ८. अहंकार - समाजकारण, राजकारण, अर्थकारण हे सर्व अहंकाराच्या कक्षेत येतात. (मात्र धर्मकारण

6.00 नाही, ते पराप्रकृतीने करायचे असते) धर्म हा परा आणि अपरा प्रकृतीत थोडा थोडा विभागला

7.00 गेला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

थोडक्यात अपरा प्रकृतीत संस्कृतीची

8.00 सारी अंगे आली आहेत भगवंतांनी एका श्लोकात सगळे विज्ञान किती सुंदर सांगितले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| August | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| Monday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Tuesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Wednesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Thursday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Friday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Saturday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Sunday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

## — संस्कृतीची अष्टांगे —

धर्मकारण समाजकारण अर्थकारण राजकारण
वाङ्मय विज्ञान कला शिक्षण

भगवंत म्हणतात तुला ज्ञान जाणून घ्यायचे असेल तर विज्ञानही जाणून घे.

चातुर्वर्ण्य का निर्माण झाले?

बृहदारण्यकात म्हटले आहे - एकाकी न रमते। असे ब्रह्माला वाटू लागले तेव्हा काहीतरी केले पाहिजे एकोऽहं बहुस्याम।

आता मीच मला अनेक रूपात प्रकट करतो मीच मला अनेकविध रूपात पहातो असा ब्रह्माने विचार केला (निर्मितीचा)

त्याने प्रथम क्षात्रांची निर्मिती केली परंतु क्षात्र फार अहंकारी त्यामुळे एकेकटाच राहू लागला. तेव्हा संपत्तीनिर्मितीसाठी वैश्य निर्माण केला. व्यापारी लोक नेहमी एकमेकांना धरून असतात. परंतु त्यानंतर निर्मितीची प्रक्रिया सतत व्हायला हवी. वर्धिष्णु व्हायला हवी म्हणून शूद्र निर्माण केला. आणि शेवटी या सर्वांना एका सूत्रात बांधेल असे काही निर्माण केले पाहिजे आणि ते निःस्पृह असायला हवे म्हणून धर्माधिष्ठित ब्राह्मण निर्माण केला. या कथेमागे किती व्यापक भाव आहे! विश्वविज्ञानाला व्यवहाराची जोड हवी नाहीतर माणसे आत्मघात करतील. आसक्ती फक्त परमार्थात व भगवंताच्या चरणी असावी.

©www.madhavveeraghuveer.com

इयम् तु अपरा | इतः अन्याम् (जीवभूताम्) पराम् प्रकृतिं विद्धि |
यया इदम् जगत् धार्यते

अपरा — कनिष्ठ, अचेतन
परा — श्रेष्ठ, चेतन

(५) प्रकृती - प्रकर्षरूपाने जी कार्य करते तिला प्रकृती म्हणतात. प्रकृती म्हणजे अविद्या किंवा माया. वासनेचा दृढ संबंध जोडून शुद्ध आत्म्याला जी जीवरूपाला आणते व अभेदात भेद निर्माण करते तिला अविद्या म्हणतात.

परा प्रकृती - आत्मा वा क्षेत्रज्ञ, जीव

अपरा प्रकृती - जड देह क्षेत्र

गुणांच्या मिश्रणातून विश्वोत्पत्ती होते अपरा प्रकृती ही भोग्य वस्तु आहे. म्हणूनच परमात्म्याने भोक्ता (जीवात्मा) निर्माण केला. अपरा प्रकृतीत सुंदर फुले आहेत परंतु त्यांचा सुगंध घेणारा, त्यांचे रूप पहाणारा नसता तर अपरा प्रकृती अर्थशून्यच झाली असती

अपरा व परा प्रकृतीचे अधिष्ठान कोणते? त्यांच्यावर स्वामित्व कोणाचे?

(६) अपरा - जड सृष्टी ; परा प्रकृती - पुरुष, जीवात्मा हे कौतुक परमात्म्याचे आहे. परमात्मा म्हणजे परम पुरुष, पुरुषोत्तम. तोच जगाचे उपादान - कारण आहे. उपादानातून निर्माण झालेली वस्तू पुन्हा त्यातच मिसळते. मातीचा घट फुटल्यानंतर मातीतच मिसळतो. त्याचप्रमाणे परमात्म्यापासून निर्माण झालेले सर्व पुन्हा मातीतच मिसळते, विलीन होते.

भगवंतच दृश्य सृष्टीचे उपादान (प्रभव) व निमित्त (प्रलय) कारण आहेत.

25 September
Friday
Week 39
268-097

2009

| August | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| Monday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Tuesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Wednesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Thursday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Friday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Saturday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Sunday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

(७) चराचराला बांधणारा धागा परमात्माच आहे. मणी एकत्र रहायचे असतील तर दोरा रहावा लागतो. तो दोरा चित् तत्वाचा आहे, तो ईशतत्वाचा आहे. तो परमेश्वरतत्वाचा आहे. तो दृश्य आहे अदृश्यही आहे. सगुण आहे आणि निर्गुणही आहे. हे संपूर्ण विश्व ब्रह्माच्या धाग्यात ओवलेले आहे ते कोणकोणत्या धर्मांनी प्रोत आहे हे भगवंत सांगत आहेत —

(८)(९)(१०)(११) A आपतत्वातील रस

B. प्रभा < प्रभाविका - चंद्र
दाहिका - सूर्य

C - प्रणव: - शब्दब्रह्म, साडेतीन मात्रामध्ये सगळी देवनागरी लिपी बसवलेली आहे. सर्व वेदांचे सार म्हणजे ॐकार

D शब्द: — ख म्हणजे आकाश. शब्द ही आकाशाची तन्मात्रा आहे. आकाशाची पोकळी दिसते पण शब्द जाणून घ्यावा लागतो. पृथ्वी व्यक्त पण तिचा गंध अव्यक्त आहे. जे जे व्यक्त रूप आहे त्या त्या मागचे अव्यक्त रूप ही आहे.

पृथ्वीच्या पाच मात्रा - रूप, रस, स्पर्श, शब्द, गंध
जलतत्वाच्या चार मात्रा - रूप, रस, स्पर्श, शब्द
तेजाच्या ~~चार~~ तीन मात्रा - रूप, रस, शब्द
वायुच्या दोन मात्रा - स्पर्श, शब्द
आकाशाची एकमेव मात्रा - शब्द

© www.madhaveelagruveel.com

E <u>पौरुषम्</u> - सगळ्या मानवांमधील पराक्रम मी आहे. पुरुषार्थ हे परमेश्वराचेच रूप आहे. स्वार्थाकडून परमार्थाकडे जाताना पहिली पायरी पुरुषार्थाची आहे.

F - <u>पुण्यो गन्धः</u> पृथ्वी पावन आहे. तिचा पुण्यगंध म्हणजे सुरभि मी आहे.

G - <u>तेजः</u> - तेजश्चास्मि विभावसौ - प्रत्यक्ष सूर्यातले तेज आणि त्या तेजातील प्रभु मीच आहे.

H - <u>जीवनम्</u> - जीवनं सर्वभूतेषु - प्राण हे सगळ्यांचे जीवन असते आणि सगळ्यांचे जीवन मीच आहे. या प्राणाचं जल हे वस्त्र आहे म्हणून भोजनापूर्वी व भोजनानंतर आपोशन घेतले जाते.

I - <u>तप</u> - तपस्वी जे तप करतात त्यांचे जे सात्विक व शुद्धातिशुद्ध तप आहे ते मीच आहे. सर्वात उत्तम तप पार्वतीने केले. तिने वाळलेले पानसुद्धा न खाता तप केले म्हणून ती अपर्णा. तिने पंचाग्निसाधन तप केले. डोक्यावर माध्यान्हीचा तळपता सूर्य आणि चार बाजूंना पेटलेला अग्नी असे ते तप असते.

Sunday 27

तपश्चर्येचा हेतू सात्विक असावा. तपश्चर्येचे अंतःकरण लोककल्याणाचे असावे.

J - <u>बीज</u> - अव्यय, अव्यक्त, अजरामर असे हे प्रणव ॐकाराचे बीज आहे ते मी सर्व भूतांमध्ये आहे.

K - <u>तेज</u> - सर्व तेजांमधले तेज मी आहे. तेजस्वी पुरुषांचे तेज ही भगवंताची विभूती आहे.

© www.madhaveeraghuveer.com

L - बुद्धी - बुद्धिमंतांमधील बुद्धी मीच आहे. मात्र ती श्रद्धा जागवणारी, श्रद्धा दृढ करणारी आणि ज्ञानाकडे नेणारी हवी. समाजाचा बुद्धिभेद करू नये. जनसामान्यांच्या श्रद्धा दृढ करणे हेच आपले नियत कार्य आहे असे स्वामी विवेकानंद मानत. अशा श्रद्धा दृढ करणारा तो खरा बुद्धिवान!

M - निश्चयात्मिका अंत:करणवृत्ती - निश्चयात्मक अशी अंत:करणाची वृत्ती म्हणजे बुद्धी होय. ऐकण्याची इच्छा, प्रत्यक्ष श्रवण, ग्रहण, धारणा, ऊहापोह, अर्थविज्ञान आणि तत्त्वज्ञान हे बुद्धीचे सात गुण आहेत.

N - बलम् - मी बलवंतांमधले बल आहे पण काम आणि राग टाकलेले असे ते बल आहे.

बलाचे पाच प्रकार आहेत.
१. वीर्यबल २. प्राणबल ३. शरीराच्या वृद्धीचे (पुष्टिचे) बल ४. बुद्धिबल ५ मनोबल.

ही पाच प्रकारची बले सात्त्विकच असावी लागतात त्यामुळे मानवी जीवनाची दिशा लोककल्याणाचीच राहते.

O - काम - धर्माच्या विरुद्ध नसणारा म्हणजेच धर्माधिष्ठित कामाचा जर सेवन केला तर शृंगाराची परिणती येते. कामाची पूर्तता आणि आनंद धर्मानुकूल, शास्त्रानुकूल पाहिजे असे भगवंत म्हणतात. धर्माला अनुकूल असा काम म्हणजे भगवंताची विभूती आहे. कामाचा अर्थ संयम, सदाचार आहे हे समजले पाहिजे

©www.madhaveeraghuveer.com

या सर्व विभूतींमधील भावांनी भगवान लिप्त आहेत की काय अशी शंका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून भगवंत सांगतात.

(१२) या सृष्टीत भगवंत विकारलेला दिसला तरी त्या विकारात तो नाही. परमात्म्याला विकार नाही.

सात्विक, राजस, तामस या गुणांपासून उत्पन्न होणारे भाव जे आहेत ते सर्व भगवंतापासून उत्पन्न होणारे असे समज परंतु त्यांच्यामध्ये भगवंत किंवा भगवंतामध्ये ते नाहीत. ढगात पाणी असते परंतु पाण्यात ढग नसतो. अंकुराचे लाकूड होते पण लाकूड म्हणजे बी नाही. अग्नीपासून धूर होतो पण धूर म्हणजे अग्नी नाही.

हे जाले जरी माझ्या ठायीं परी त्यामाजी मी नाही॥

ईश्वरापासून विकार झाले तरी ईश्वर विकारी नाही. शिवाय अल्पसा विकार असल्यावाचून इच्छित वस्तू मिळत नाही. दुधाला विरजण लावून दही मिळणं हा मर्यादित विकारच आहे.

प्रकृती त्रिगुणात्मक आहे -

सत्वगुण - बोधात्मक

रजोगुण - प्रवृत्ति (चंचल)

तमोगुण - जडत्व अज्ञान.

या त्रिगुणांचे सत्कार्य अपरिहार्य आहे असे सांख्यांचे म्हणणे आहे. या तीनपैकी एक गुण बळावला की इतर दोन गुण पराभूत होतात. प्रकाशासाठी तेल, वात, ज्योत या सर्वांचीच आवश्यकता असते.

© www.madhaveeraghuveer.com

| August | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| Monday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Tuesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Wednesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Thursday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Friday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Saturday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Sunday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

त्याचप्रमाणे प्रकृतीसाठी सत्त्व, रज, तम या तिन्ही गुणांची आवश्यकता असते यांना अन्योन्याश्रयवृत्ती म्हणतात. यातील एका गुणामुळे दुसऱ्याची वाढ होते. ते एकमेकांना सोडून कधीही राहत नाहीत. सत्त्वाकडे झेपावणे म्हणजे ज्ञानाने सर्वांचे योग्य ते ज्ञान करून घेणे त्यामुळेच मोक्षाची प्राप्ती होते.

परंतु ही वस्तुस्थिती माणसाच्या लक्षात येत नाही.

(53) मायेचे आवरण - ढगांमुळे आकाश दिसत नाही पण आकाश असतेच. तसेच त्रिगुणांच्या आवरणामुळे माणसे परमात्म्याला जाणत नाहीत. कोणतीही वस्तू आणि तिची शक्ती यांचे ऐक्यच असते. शक्तीची अव्यक्त दशा म्हणजे वस्तू आणि वस्तूची व्यक्त दशा म्हणजे शक्ती होय. त्रिगुणरूप शेवाळ्यामुळे ईश्वराचे यथार्थ दर्शन होत नाही.

मायेचे त्रिगुण कसे असतात?

लोभ आणि मोह यांना वश झाल्यामुळे मनात क्रोध असणे, अधर्माकडे प्रवृत्ती असणे अशी जी इंद्रियांची स्थिती तिला 'तमोगुण' म्हणतात. तमोगुणामुळे मनाची स्थिती जड होते व संकल्पांची स्फूर्तीही होत नाही. सत्त्व व रज यांना लोप करून जेव्हा तमोगुण प्रबळ होतो तेव्हा तो त्या पुरुषाला पक्का जड, मूढ व स्तब्ध करून टाकतो. परद्रव्य बुडवणे,

[illegible] ॥५२॥ [illegible] ॥५२॥
[illegible] ॥५२॥ तो (तमोगुण)॥

दुसऱ्याचे सर्व जावे। माझेचि वरि असावे।
ऐसे आठवे जयाचे। तो रजोगुण॥

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| December | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

2009

October
Thursday
Week 40
274-091

01

परस्त्रीगमन करणे, स्वमुखाने दुसऱ्याचे दोष उच्चारणे साधुंची निंदा करणे, संतसज्जनांचा द्वेष करणे ही लक्षणे जिथे दिसतील तिथे तमोगुणाचे ठाणे अनिवार्य होऊन बसते असे समजावे.

तमोगुणाची १६ लक्षणे आहेत.

क्रोधो लोभोऽनृतं हिंसा याच्या दम्भः क्लमः कलिः।
शोकमोहौ विषादार्ती निद्राशा भीरनुद्यमः॥

देहामध्ये जेव्हा ज्ञानाभिमान उत्पन्न होतो तेव्हा 'रजोगुण' बळावतो. अशा माणसाला ज्ञानीपणा असून कामासक्ती असते रजोगुणाची वाढ बळावली की तो सत्व आणि तम यांना जमीनदोस्त करतो. रजोगुणी व्यक्तीला वाटते की त्रिभुवनात मीच एकट. तो काय पवित्र, माझेच कर्माचरण श्रेष्ठ ही राजस स्थिती समजावी. तो अचाट कामे अंगिकारतो आणि उद्योगाचा पसारा वाढवतो.

रजोगुणाची १५ लक्षणे आहेत.

काम ईहा मदस्तृष्णा स्तम्भ आशीर्भिदासुखम्।
मदोत्साहो यशः प्रीतिर्हास्यं वीर्यं बलोद्यमः॥

असे हे तम व रज भयंकर आहेत. यांना नि:शेष करण्यासाठी सत्वगुण वाढवावा लागतो.

सत्वगुणाच्या १५ लक्षणांची स्थिती ज्याच्याकडे आहे तोच खरा सत्वगुणी! तो शुद्ध सत्वाची मूर्ति असतो. सत्वगुणांची वृद्धी होण्यासाठी सत्संग आवश्यक असतो.

©www.madhaveeraghuveer.com

निरूपणाची आवडी जया । हरिकथेची गोडी ।
क्रिया पालटे ठेवडी । तो सत्वगुणी ॥

# 02

October
Friday
Week 40
275-090

2009

| September, Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October, Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

शमो दमस्तितिक्षेक्षा तपः सत्यं दया स्मृतिः ।
तुष्टिस्त्यागोऽस्पृहा श्रद्धा ह्रीर्दयादिः स्वनिर्वृतिः ॥

हा सत्वगुण दहा कारणांमुळे वाढू शकतो

आगमोऽपः प्रजा देशः कालः कर्म च जन्म च ।
ध्यानं मन्त्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतवः ॥

शास्त्र, पाणी, प्रजाजन, देश, वेळ, कर्म, जन्म, ध्यान, मंत्र आणि संस्कार या दहा गोष्टी जर सात्विक असतील तर त्यामुळे निश्चित सत्वगुणाची वृध्दी होते.

सत्वगुणाची थोरवी - जेव्हा अभिमानरहित स्वधर्माचरण तेव्हा त्या पुरुषाच्या ठिकाणी सत्वगुणाची वृध्दी होते. जेव्हा भाग्याचे भांडार उघडते, त्या वेळी हरिकथेचे श्रवण घडते. मुखाने हरिनामाचे कीर्तन करणे आवडते. दैवयोगाने सत्संगती घडली तर भगवंताचे गुणवर्णन ऐकण्यासाठी कान आतुर होतात. आणि वाणी अत्यंत प्रेमाने रात्रंदिवस भगवंताची नामकीर्ति वर्णन करण्यात गढून जाते. अशा प्रकारच्या आचरणाने रज-तम क्षीण होतात व मोठ्या उत्साहाने सत्वगुण वाढतो.

अशा साधक पुरुषाला विवेकाची नौका सापडते. वैराग्याचे आत्मरहस्य त्याला प्राप्त होते. सर्व इंद्रियांमध्ये प्रकाश पडतो आणि स्वधर्म तर शिखराला पोहोचतो. सात्विक मनुष्य म्हणजे शुध्द सत्वाची राशच होतो. सत्वगुण इतका शुध्द असला तरी माणसाच्या ठिकाणी अंशतः तरी अहंकार ठेवतोच.

सत्कर्माची आवडी जया । जो कामी हरिभजनाला ।
ज्ञान शिकवी अज्ञानाला । तो सत्वगुणी ॥

तम - रज - सत्त्व गुणांची प्रतीके म्हणजे दानव - मानव - संत वा श्रेष्ठ आचार्य होत.

ही त्रिगुणात्मक माया जिंकल्यानंतर ईश्वराचे दर्शन आहे. तिला जिंकायचे कसे ते भगवंत सांगतात

(१४) ही अलौकिक (दैवी) अशी योगमाया दुस्तर आहे. परंतु जे पुरुष मलाच भजतात ते या मायेला उल्लंघून जातात.

या मा सा माया। असे गंमतीने म्हटले जाते.

माया ही ब्रह्माची शक्ती आहे. ती भौतिक व जड आहे. ती अनादि असली तरी सत्य मात्र नाही. या मायारूपी नदीमध्ये कित्येक उतरले. काही बुडाले. काहींना जलचरांनी गिळले. काही कपारीत अडकून पडले. काहींचा पत्ता नाही. तात्पर्य - कोणताही उपाय केला तरी माया उपासकाला गिळतेच. म्हणून मायेचा स्वामी जो परमेश्वर त्याला शरण जाणे श्रेयस्कर. त्याची कृपा झाल्यावर माया तरून जातो.

तर मग सर्व प्राणिमात्र या मार्गाला आश्रय का घेत नाहीत?

(१५) परमात्म्याला शरण न जाता आसुरी मार्गाचा अवलंब करणारे दुष्ट चार प्रकारचे असतात.

१. मूर्ख २. नराधम ३. आसुरी ४. अज्ञानी

मूर्ख - मूर्खस्य पंच चिह्नानि गर्वो दुर्वचनं तथा।
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते॥

असे मूर्ख ईश्वराच्या स्वरूपाविषयी ज्ञानशून्य असतात.

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

नराधम -

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थं परित्यज्य ये।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये॥
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये।
ये निघ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे॥

ईश्वराविषयी जाणीव असूनही ज्यांच्या मनात ईश्वराविषयी श्रद्धा व प्रेम नसते.

अज्ञानी - श्रेयसाला त्यागून प्रेयसाला कवटाळणारा तो अज्ञानी

आसुरी -

हस्ताग्रे भुवि भूरि निम्बतरवः कुत्रापि ते चन्दनाः।
पाषाणैः परिपूरिता वसुमती वज्रो मणिर्दुर्लभः।
श्रूयन्ते करटारवाश्च सततं चैत्रे कुहूकूजितं
तन्मन्ये खलसंकुलं जगदिदं द्वित्राः स्थिताः सज्जनाः॥

आसुरी प्रवृत्तीचे लोक म्हणजे केवळ देहालाच सर्वस्व मानणारे, चंगळवादाचे पुरस्कर्ते.

जे देहाभिमानी नसतात, तेच सज्जन असतात आणि ईश्वराला भजतात. ते कोण?

(१६) मागील श्लोकात दुष्कृतिन् ईश्वराला भजत नाहीत असे सांगितले आता सुकृतिन् म्हणजे कोण ते सांगत आहेत - शास्त्रानुसार जे कर्मे करतात - जे सत्कर्मे करतात ते सुकृतिन होत. हे चार प्रकारचे असतात - आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी

(१) आर्तभक्त - उत्तम उदाहरण म्हणजे द्रौपदी

युधिष्ठिराने वनवासात असताना सूर्याची स्तुति गायली सूर्याने प्रसन्न होऊन त्याला भोजनाचे अक्षयपात्र दिले.

© www.madhaveeraghuveer.com

जोपर्यंत द्रौपदी भोजन करत नसे तोपर्यंत त्या पात्रातून अन्न प्राप्त होत असे. एकदा दुर्वास मुनी सतःया दहा हजार शिष्यांना घेऊन पांडवांकडे भोजनासाठी आले. द्रौपदीचे नुकतेच भोजन झाले होते त्यामुळे अक्षय पात्रातून भोजन मिळणार नव्हते. तेव्हा द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाचे मोठ्या आर्ततेने स्मरण केले. तेव्हा भगवान श्रीकृष्ण प्रकट होऊन द्रौपदीच्या थाळीला लागलेले भाजीचे एक पान केवळ त्यांनी खाल्ले आणि संपूर्ण विश्वाचा आत्मा तृप्त झाला. दुर्वास आणि त्यांचे दहा हजार शिष्य यांना अचानकच तृप्तीचा अनुभव येऊ लागला. अशा रीतीने पांडवांवर आलेले संकट टळले हे आर्त भक्तीचे उत्तम उदाहरण आहे. त्याच प्रमाणे इन्द्रवर्षेने व्याकुळ झालेले ब्रजवासी, वस्त्रहरणाच्या प्रसंगी द्रौपदी, गजेंद्र ही सर्व आर्त भक्तांचीच उदाहरणे आहेत.

(२) अर्थार्थी भक्त - ध्रुव हे आदर्श अर्थार्थी भक्ताचे उदाहरण आहे. वडिलांच्या मांडीवरून अपमानित होऊन जेव्हा ध्रुव आईकडे रडत आला तेव्हा आईने त्याला श्रीहरीला शरण जायला सांगितले. वनात त्याची नारदांशी भेट झाली. त्रैलोक्यातील सर्वश्रेष्ठ (अढळ) स्थान मिळवण्याची त्याची इच्छा त्याने व्यक्त केली. नारदाने त्याला 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्रोपदेश केला. आपल्या तपश्चर्येने ध्रुवाने भगवंताला प्रसन्न करून घेतले आणि आपले ईप्सित पूर्ण केले.

| September | | | | | | October | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 | Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 | Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | | Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | | Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | | Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | | Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

③ जिज्ञासू भक्त - भगवत् तत्त्व जाणण्याची उद्धवाची इच्छा होती, तीव्र जिज्ञासा होती. ती भगवंतांनी पूर्ण केली. उद्धव हा श्रीकृष्णाचा सखा व मैत्री होता. भगवंतांकडून आत्मविद्या प्राप्त झाल्यावर हा बदरिकाश्रमात तपश्चर्येसाठी गेला.

④ ज्ञानी भक्त - शुकाचार्य शंकराचार्य, महर्षि व्यास.

ह्या चार भक्तांपैकी ज्ञानी भक्त हा परमेश्वराला प्रिय आहे.

(१७) ज्ञानी भक्त परमेश्वराची निर्हेतुक भक्ती करतो. भगवंत म्हणतात - त्याला मी आणि मला तो अतिशय प्रिय आहे.

आर्त, जिज्ञासु आणि अर्थार्थी हे सकाम भक्त आहेत परंतु ज्ञानी हा निष्काम भक्त आहे.

(१८) भगवंताला जर हाच (ज्ञानी) भक्त प्रिय असेल तर इतर भक्तांचे काय?

तर हे सर्व उदार म्हणजे श्रेष्ठच माझ्या भजनी समय लावणारे असल्याने उत्तमच आहेत. परंतु ज्ञानी भक्त हे तर साक्षात माझेच स्वरूप आहे. कारण तो माझ्याठिकाणीच चांगल्या प्रकारे स्थित असतो. चित्तशुद्धी व ज्ञानलाभ यांच्या द्वारे इतर तीन भक्त ज्ञानाची प्राप्ती करू शकतात जे उत्कृष्टतेला पात्र आहेत ते उदार आहेत. ज्ञानी भक्त हा त्रिगुणातीत असतो तरीसुद्धा देहाच्या माध्यमाने तो सात्त्विक, शुद्ध कर्मेच आचरतो. वर्णाश्रमधर्मानुरूप तो नित्य नैमित्तिक कर्मे करतो.

9.00 निषिद्ध कर्माकडे तो वळत नाही.
ज्याप्रमाणे सोन्याचे कांकण सोन्याशी, पाण्याची
10.00 लाट पाण्याशी, सुवास कापुराशी, तंतु वस्त्राशी
अभिन्न असते त्याप्रमाणे भक्त ईश्वराशी
11.00 अभिन्न असतो. ज्ञाननिष्ठेमुळे स्वकर्म आचरण्याचे
सामर्थ्य लाभते परंतु त्याची परिणती ज्ञानोत्तर
12.00 भक्तीत होते.
ज्ञानी भक्त हा श्रेष्ठ तर आहेच परंतु तो
1.00 दुर्लभ आहे
(१९) पुष्कळ जन्मांच्या शेवटी तत्त्वज्ञान प्राप्त झालेला
2.00 ज्ञानी 'सर्व काही वासुदेवच आहे' अशा प्रकारे
मला भजत असतो तो महात्मा अति दुर्लभ आहे
3.00 वासुदेवः सर्वम् - विष्णुपुराण म्हणते -
भूतेषु वसते सोऽन्तर्वसन्त्यत्र च तानि यत् ।
4.00 धाता विधाता जगतां वासुदेवस्ततः प्रभुः ॥
ही अनेक जन्मांची तपश्चर्या आहे. मग एखादाच
5.00 शुक, एखादाच ज्ञानेश्वर जगाला दिसतो.
भगवंत म्हणतात - भक्त निजबोधाने माझ्यात
6.00 आणि मी निजांगाने त्यांच्यात आणि बाहेरही
असतो. आत्मसुखाच्या माजघरात आम्ही परस्पर
7.00 नांदत असतो. मी एक देव आणि तो एक भक्त
ही सुद्धा बाहेरून बोलण्याची गोष्ट. गुह्य अर्थाचा
8.00 विचार केला असता मी आणि भक्त एकच आहोत.
रूप थिजले काय किंवा विरघळले काय? माझ्यामध्ये
आणि भक्तांमध्ये कल्पांतीसुद्धा भिन्नभाव नाही.

© www.madhaveeraghuveer.com

(२०) ज्यांच्या हृदयात भगवान असतो तो ज्ञानी होतो आणि ज्यांच्या हृदयात काम असतो तो हतज्ञानी होतो. हत म्हणजे ईश्वराला, वासुदेवाला विन्मुख होणे. म्हणजे खऱ्या ज्ञानापासून भ्रष्ट होऊन सकाम भक्तीला लागलेले (भौतिक सुखापासून स्वर्गसुखाची इच्छा करणारे सर्वजण हतज्ञानी असतात. ते देहबुद्धीचे दास असतात. भोगासाठी विषयलालसेसाठी हीन दीन झालेले असतात. कामाच्या संसर्गाने ज्ञानाचा दिवा मालवतो. दारा, लोक, वित्त अशा तीन प्रकारच्या तीव्र एषणा आहेत. ज्ञानी माणसाला त्याचे आकर्षण नसते पण हतज्ञानीला असते.

असे सकाम भक्त यांच्या त्यांच्या देवतांना भजतात.

(२१) जो जो सकामी भक्त ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाला श्रद्धेने पूजण्याची इच्छा करतो त्या त्या भक्ताची मी त्याच देवतेच्या ठिकाणी श्रद्धा स्थिर करतो.

सकाम भक्तीने अद्वैत लाभत नाही. सकाम भक्ती द्वैती असते आणि आत्मसाक्षात्कार केवळ अद्वैतातच संभवतो.

जशी श्रद्धा तसे फळ मिळते.

(२२) सकाम भक्तीचे फळ नाशवंत. एकमेव परमात्मा सर्व देवदेवतांत आहे हे सकाम भक्ताच्या लक्षात येत नाही. त्या त्या देवतांविषयी त्याची भिन्न भूमिका असते. त्यामुळे फलप्राप्तीसाठी तो देवतांची

© www.madhaveeraghuveer.com

उपासना करतच रहातो त्याच्या सकाम भक्तीचे तसेच (म्हणजे नाशवंत) फळ त्याला मिळते.

शुद्ध भावाशिवाय जी भक्ती, ती खरोखर दांभिक भक्ती होय. धान्यातले कुचरदाणे जसे अपक्व रहातात तशी ती भक्ती अपक्वच रहायची.

(२३) मानवांप्रमाणे देव हीसुद्धा एक योनीच आहे. इन्द्रादि देवगणसुद्धा विनाशशीलच होते. जे स्वतः विनाशशील असतात त्यांच्या आराधनेचे फळ देखील नाशवंतच असणार

यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी।

म्हणून पूर्ण, अनंत अविनाशी परमात्म्याचीच उपासना करावी. त्या उपासनेचे जे मागितलेले फळही अविनाशीच असते

उद्योगपती - कारखान्याचा मालक - अधिकारी - कामगार.

या साखळीप्रमाणे कामगारांचा फक्त त्यांच्या वरील सुपरवायझर किंवा फार तर, अधिकारी वर्गाशी संबंध येतो. परंतु ते सुद्धा नोकरदारच आहेत. या सर्वांचा जो सूत्रधार तो त्यांनी क्वचितच पाहिला असतो. पण तो सर्वसाक्षी असतो. एखाद्या सामान्य कामगाराचे निरपेक्ष वृत्तीने, आपल्या कामाच्या ठिकाणी श्रद्धा ठेवून केलेले असामान्य चांगले काम त्याला अनपेक्षित बढती देऊन जाते. परमेश्वर सर्वसाक्षी आहे.

तुमची उपासना सात्त्विक असेल तर सात्त्विकच फळ मिळेल. ∴ शुद्ध उपासनाच करा.

Sunday 11

© www.madhaveeragniveer.com

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

सच्चिदानंद परमेश्वराच्या उपासनेचे फल सर्वोत्तम असूनही सर्व जीव या परमात्म्याला का भजत नाहीत अशी शंका स्वाभाविकपणे मनात येते.

(२४) वस्तुत: परमात्मा अव्यक्तच आहे परंतु मूढ जन त्या अव्यक्ताला व्यक्त समजतात

परमात्मा ब्रह्मस्वरूप आहे तो अव्यय आहे म्हणजे देशकालानुरूप तो सीमित होऊ शकत नाही तरीही भक्तजन त्याला शरीरी समजतात. इंद्र, शक्ती, शिव, विष्णु अशा देवता करून त्यांचे पूजन करतात.

परब्रह्म जर निष्क्रिय, निराकार, निर्विकार, निर्गुण असेल तर त्याची उपासना करणे काय होणार? ब्रह्म जर समूर्त नसेल तर त्याची उपासना कशी करता येईल असे सकाम भक्ती करणाऱ्या अज्ञानी जनांना वाटते.

(२५) या लोकांचे हे अज्ञान कशामुळे असते?

आपल्या योगमायेचे आवरण घेतल्यामुळे मी सर्वांना प्रत्यक्ष होत नाही. म्हणून अज्ञानी मनुष्य जन्मरहित, अविनाशी अशा मला जाणत नाहीत.

योगमाया - चित्रपट ज्याप्रमाणे तत्कालिक, खोटा पण प्रभाव टाकणारा असतो, त्याप्रमाणे मायेचे आहे. भगवंत मायेतून विश्व पहातात पण मायेतून भगवंताला पहाता येत नाही.

One way View.

© www.madhaveeragruver.com

प्रकटे तंव तंव न दिसे । लपे तंव तंव आभासे ।
व्यक्त | अव्यक्त



आपल्या खोलीत बसलेला कार्यालयाचा मालक काचेला लावलेल्या फिल्ममधून बाहेरचे सर्व पहातो पण बाहेरच्या माणसाला आतले पहाता येत नाही. तसेच काहीसे हे आहे.

मायेहून ब्रह्म वेगळे - ब्रह्म निर्गुण निराकार तर माया सगुण साकार आहे.

| ब्रह्म | माया |
|---|---|
| निर्मळ निश्चळ | चंचळ, चपळ |
| अमर्यादित | मर्यादारूप |
| दिसत नाही | दिसते |
| भासत नाही | भासते |
| नाश पावत नाही | नाश पावते |
| निर्माण होत नाही | निर्माण होते |
| विकारांपासून मुक्त | विकारयुक्त |
| रूपरहित | रूपसहित |
| शाश्वत एकच एक | अशाश्वत, अनेकरूपी |
| विशाल | लहान |
| स्थलातीत | स्थलयुक्त |
| निर्मळ | मलिन |
| सूक्ष्म | स्थूल |
| अतींद्रिय | इंद्रियगम्य |
| सिद्धांत | पूर्वपक्ष |
| अबाधित | बिघडते |
| अनंत | अंतवंत |
| नाजुक, कोमल | कठीण |

© www.madhaveeraghuveer.com

| September | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

| October | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

मायेमुळे भगवंत दिसत नाहि पण भगवंत मायेच्या आधीन नाहित. मायाच त्यांच्या आधीन आहे हेच आता भगवंत सांगत आहेत.

(२६) पूर्वी होऊन गेलेली, वर्तमानकाळी असलेली, आणि भविष्यकाळात पुढे होणारी अशा सर्व भूतांना मी जाणतो परंतु मला कोणीही श्रद्धाभक्तिरहित पुरुष जाणत नाही.

परमात्म्याला कोणत्याही मर्यादा नाहीत.

याज्ञवल्क्य - मैत्रेयी संवाद

परमात्मा सर्वत्र, अपार अनंत आणि विज्ञानघन आहे. अवघे अद्वैतच आहे. अविद्येने द्वैत भासते. श्रोता शब्द ऐकतो, वक्ता भाषण करतो, द्रष्टा रूप पहातो घ्राता वास घेतो पण जेव्हा कर्ता - कर्म - क्रिया - फल हे सगळे लय पावून आत्माच होतात त्यावेळी कोणत्या साधनाने पहाणार, ऐकणार किंवा बोलणार?

व्यवहार द्वैतात आहे. परमार्थ व्यवहारातीत आहे, अद्वैत आहे.

(२७) अहंकार आत्मनाश करतो - यावर माऊलीने एक सुंदर रूपक मांडले आहे. ते गंमतशीर पण यथार्थ आहे.

जेव्हा अहंकार आणि देह यांचे परस्परांवर प्रेम जडले तेव्हा त्यांना इच्छा ही मुलगी झाली. जेव्हा ही मुलगी कामदणी तारुण्याला आली त्या वेळी तिचे द्वेषाशी लग्न लावले. त्या दोघांपासून द्वंद्वमोह जन्मला मग त्याला आजा अहंकार याने त्याला वाढवले. तो

© www.madhaveeraghuveer.com

दंभमोह सात्त्विक धैर्याला नेहमी प्रतिकूल असतो आणि जर तो आशारूपी रसाने पुष्ट झाला तर तो फळणारा. दंभमोह नियमांना जुमानत नाही. तो असंतोषरूप दारूच्या योगाने उन्मत्त होऊन पंचविषयरूपी खोलीमध्ये विकाररूपी स्त्रीसह राहतो. त्या दंभमोहाने अंतःकरणशुद्धीच्या मार्गावर विकल्परूपी काटे पसरले आणि नंतर निषिद्ध कर्मांचे आडमार्ग खुले केले. त्यायोगाने प्राणी भांबावले म्हणून संसाररूपी अरण्यात पडले आणि मग मोठमोठाल्या दुःखाच्या दाढांनी बडवले गेले. (ज्ञाने. ७.१६५-१७१)

इच्छेचे विषय आहेत सुख व सुखाची साधने
तर द्वेषाचे " " दुःख " दुःखाची "
दोन्ही परस्परविरोधी आहेत. यापासून सुखदुःखादि द्वंद्वे निर्माण होतात त्यामुळे मनुष्यप्राणी मोहाने अज्ञानावस्थेला प्राप्त होतो. अशा जीवाला बद्ध म्हणतात

मानववृत्तींची विभागणी चार प्रकारात होते.

बद्ध — मुमुक्षु — साधक — सिद्ध

या चौघांविरहित काही सचराचरी जाणवा नाही।

मूर्ख व पढतमूर्ख ही बद्धांचीच उदाहरणे आहेत सुख यावे व दुःख जावे अशा द्वंद्वरूप इच्छेच्या मोहात जे प्राणी सापडतात ते बद्ध मूर्ख व पढतमूर्ख असतात.

सामान्य माणसाच्या आयुष्यात हे असेच घडते. म्हणून सत्संगतीने, चांगल्या श्रवणाने आत्मोन्नत होण्यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे.

| September | | | | | | October | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 | Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 | Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | | Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | | Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | | Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | | Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

हे कसे घडावे याचे उत्तर भगवंत देतात.

(२८) द्वंद्वे सोसा - आत्मोन्नतीसाठी, निर्द्वंद्व व्हा.

या सृष्टीतील द्वंद्वे ज्यांनी धीरोदात्तपणे पचवली तेच दृढव्रत होतात आणि भगवंत भजनाला लागतात. शेवटी त्यांना कृतार्थता लाभते.

संसारातील दुःखाने गांजलेला आणि त्रिविधतापाने पोळलेला माणूसच परमार्थ मिळवण्यास लायक होतो.

त्रिविध तापांनी पोळल्यानंतरच या भौतिक प्रपंचापलीकडे काही आहे याची जाणीव प्रथमच होते. प्रपंचातील अनाकलनीय अशा भयंकर घटनांनी माणूस हादरून जातो. आजवर जे शाश्वत म्हणून कवटाळलेले असते ते क्षणार्धात नाश पावते. आप्तेष्टांचे अचानक मृत्यु होतात. संपत्ती नाश पावते. हितासाठी जमलेली भुते दूर पळून जातात. कालांतराने का होईना माणसाला विलक्षण खेद होतो. प्रपंचाची उदासीनता त्याच्या मनात प्रथमच जागते.

ज्याच्या अंतःकरणाला पश्चात्तापाचे चटके बसतात तोच मुमुक्षु होऊ शकतो. माणूस आत्मपरीक्षण करायला शिकतो. स्वतःचे दुर्गुण प्रत्ययाला येतात. द्रव्य, कुळ, देह, रूप इ. चे अभिमान गळून पडतात. सत्संगाची, निरूपणाची जाणीव प्रथमच त्याच्या मनात उमलते. मोक्ष असतो आणि साधनेच्या मार्गाने तो मिळू शकतो ही जाणीव

© www.madhaveelaghuveer.com

## मुमुक्षुता होते

ज्याला लौकिक मोठेपणाची लाज वाटते, जो परमार्थासाठी झीज सोसतो; संतचरणी ज्याचा विश्वास जडतो तो मुमुक्षु असतो. ज्याचा प्रापंचिक स्वार्थ सुटतो, ज्याला परमार्थाची उत्कट इच्छा उत्पन्न होते आणि 'मी संतांचा होऊन राहीन' असे ज्याला मनापासून वाटते तो मुमुक्षु असतो.

बद्धावस्थेत सगळा अंधारच असतो. मुमुक्षुत्वाच्या पायरीवर प्रकाश दिसावा अशी तळमळ निर्माण होते.

मुमुक्षु अवस्थेत उपासना कशी करावी, तत्संबंधी दिशा कोणती हे कळत नाही. परंतु हे जाणून घ्यावेसे वाटते. त्यासाठी कोणी मार्गदर्शक हवा असतो. ही पायरी ओलांडून साधकावस्थेपर्यंत जाण्यासाठी सद्गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय पर्याय नाही.

साधक झाल्यानंतर मनाला, चित्ताला, बुद्धीला अंतःकरणाला स्वरूपाचे ध्यान लागते. मनात दृढ श्रद्धा बळावते. परमार्थसाधनेत अनुभूती अत्यंत महत्त्वाची आहे. असा साधक सतत स्वरूपाचे अनुसंधान ठेवतो 
विवेकाने कर्तेपणाचा अभिमान दूर सारतो त्यामुळे प्रपंचाचे ओझे हलके होऊ लागते.

अशा भजनाचे उपासनेचे श्रेष्ठ प्रयोजन आता भगवंत सांगत आहेत.

(२९) जे मला शरण येऊन वार्धक्य व मरण यापासून सुटण्याचा प्रयत्न करतात ते पुरुष, ते ब्रह्म अध्यात्म आणि संपूर्ण कर्म जाणतात

© www.madhaveeraghuveer.com

सिद्ध पुरुषाची लक्षणे -

१. संशयाची पूर्णपणे निवृत्ती होते.

२. संदेह गेल्याने केवळ निश्चयाचे समाधान उरते.

३. आत्मज्ञान होते.

४. आत्मज्ञान झाल्यावर सिद्ध स्वतःच परब्रह्म स्वरूप होतो. मानवी जीवनाचे हे अंतिम लक्ष्य आहे.

स्वरूपानुसंधान हे स्पष्ट लक्षण साधूच्या ठिकाणी स्पष्ट दिसते. ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय ही त्रिपुटी मावळते. देहबुद्धीचा नाश होऊन आत्मज्ञान उमलते.

त्याला परब्रह्मरूपी पिकले फळ लाभते. त्या पिकल्या फळातून पूर्णतेचा रस गळतो. कृतकृत्यतेने जग भारून जाते. ब्रह्माच्या सहज-स्थितीचा अनुभव येतो. कर्माचे प्रयोजनही संपते. मन मनाहीसे होते आणि अद्वैताचा शुद्ध अनुभव येतो.

असे ज्ञानी भक्त भगवंताला कसे प्राप्त होतात ते शेवटच्या श्लोकात सांगितले आहे.

(३०) जे पुरुष अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ यांसह मला अंतकाळीही जाणतात, ते युक्त चित्ताचे पुरुष मला जाणतात म्हणजे मला येऊन मिळतात.

८ व्या अध्यायाची प्रस्तावना : २९, ३० या श्लोकांमध्ये भगवंत करतात. यात भगवंतांनी ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ आणि प्रयाणकाळी योग्यांना होणारे भगवंताचे स्मरण या सात गोष्टींचा उल्लेख केला.

© www.madhaveerahulveer.com

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| December | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

2009

October
Tuesday
Week 43
293-072

# 20

9.00 प्रपंच वा दृश्य सृष्टी खरी मानणे अशी जी
बुद्धी त्याला 'अज्ञान' म्हणायचे. संपूर्ण प्रपंचाची
10.00 वा सृष्टीची यथार्थ माहिती म्हणजे 'विज्ञान'
आणि या सृष्टीचे जो कारण परमात्मा ~~म्हणजे~~
11.00 त्याचा आत्मसाक्षात्कार म्हणजेच 'ज्ञान किंवा आत्मज्ञान'

12.00

1.00

2.00

3.00

4.00

5.00

6.00

7.00

8.00

© www.madhaveeraghuveer.com

**September**

| Week | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

**October**

| Week | 40 | 41 | 42 | 43 | 44 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

(2) अध्यात्म - प्रत्येक आत्मा सर्व ठिकाणी आहे
9.00 सामावलेले असणे।

(1) Brahma is indestructible
10.00 Karma is the creative force that
11.00 brings being into existence, becoming
Karma is the principle of movement

12.00 प्रत्येक आत्म्या ठिकाणी ज्ञान - कर्म - क्रिया आहे
हेच अध्यात्म

1.00
(3) कर्म - शिव शक्ती - ईश्वराचे अक्षर आवरण
2.00 होत आहे त्यामुळे सूक्ष्म हे स्थूल होत आहे
म्हणजेच भूतभाव निर्माण होणार आहे → बुद्धि -
3.00 मन - आकाश - वायु - अग्नि - आप - पृथ्वी

(4) अधिभूत - नाशिवंत सृष्टी - जड - आधिभौतिक
4.00

(5) अधिदैव - जीव (परा प्रकृति) म्हणजेच पुरुष हा
5.00 दुसरा परमात्माच आहे.
विश्वनिर्मिती चैतन्याकडून जडाकडे होते. अधिभूत
6.00 निर्माण होताना प्रथम परा प्र. (जीव) निर्माण होतो
मग क्रमाने अहंकार - बु. म. पंचभौतिक शरीर बनते

(6) 7.00 अधियज्ञ - देहातील परमात्मा हे ईश्वर रूप आहे.
परंतु देह मायेचा पडदा आहे. सुषुप्ति मध्ये ...
8.00

© www.madhaveeraghuveer.com